ATOMIC ENERGY CENTRAL SCHOOL NO. 2, MUMBAI

**PERIODIC TEST – 1 (2023 – 24)** Date: 17/07/2023

M.M: 40 Class VII 2nd Lang. Marathi Time: 90Min

Marathi- Balbharti-5th (L-7,9,10,11)

**प्रश्न 1 अ] खालील पठीत गद्य उतारा वाचून योग्य उत्तराचा पर्याय निवडा (5)**

गॅसबत्तीच्या प्रकाशात हिरवागार शालू झागमाग करावा तसं ते वावर चमकत होतं. वर ऊन असलं तरी खाली गार वाटत होतं. शेंगांना आलेली पिवळी फुलं वेलबुट्टीगत दिसत होती. हिरव्या पिवळया रेशमी धाग्यांचा एक रुमालच खाली विणला होता. रात्रंदिवस घाम गाळून आपल्या हातांनी काढलेल्या त्या कशिद्याकडे बघत जनाई थोडा वेळ उभी राहिली आणि एकाएकी एक विमान चालल्याचा आवाज कानावर येऊ लागला. भर दुपारची वेळ आणि रौं रौं रौं करून आवाज कानावर येऊ लागला. 'अगंबाई, विमान!' म्हणून तिनं वर बघितलं, पण वर काहीच नव्हतं! नुसतं कोरडं आभाळ पसरलं होतं.

निळंभोर आभाळ. चिटपाखरूसुद्धा नव्हतं आणि रौं रौं रौं असा आवाज तेवढा कानावर येत होता. कुठून आवाज येतोय हे कळेना आणि झेंडू फुटल्यागत झाला. उभं रहायला नको म्हणून गडबडीनं वेल उपटायला खाली वाकली आणि विमान समोरून अंगावर आल्याचा भास झाला! खाली केलेली मान वर करून बघती, तर समोरच्या चार काकरीचे वेल उलथेपालथे होत होते. भुईमुगाच्या आ-या वर उचलत होत्या आणि पायाखालची जमीन हादरा देत होती.

१.वावर ______ चमकत होतं.

(गॅसबत्तीसारखं / सूर्य प्रकाशासारखं / हिरव्यागर शालू सारखं)

२.शेंगांना आलेली फुले ______ रंगाची होती. (हिरव्या / झेंडूच्या / पिवळया)

३. रात्रंदिवस घाम गाळणे हा शब्दसमूह वापरुन एक वाक्य तयार करा.

४. भर दुपारी विमान आले असावे असे जनाईला का वाटले?

५. जनाईने मान वर करून बघितले तेव्हा तिला काय-काय दिसले?

**प्रश्न 1 ब] खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. ( कोणतेही तीन ) (6)**

१. शिकार झालेला प्राणी कोणता होता, हे कशावरून समजते?

२. भुजंगाचे वर्णन आठवून एखादी गाय तुमच्या अंगावर येत आहे अशी कल्पना करून त्याचे वर्णन करा.

३. कोणाच्या रंगांना 'जादूच्या पेटितील रंग' असे म्हटले आहे ? का ते स्पष्ट करा.

४. गाडीवानाला हुंदके का आवरत नव्हते?

५. गाडीवानावर ओढवलेला प्रसंग पाहून तुम्ही कोणती भूमिका घेतली असती ते सांगा.

**प्रश्न 1 क] खालील शब्द व वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग करा. ( कोणताही एक ) (1)**

(१) वाट वाकडी करणे (२) हात जोडणे

**प्रश्न 2 अ] खालील कवितेच्या ओळी वाचून प्रश्नांची उत्तराचा योग्य पर्याय निवडा.** **(8)**

रंग जादुचे पेटीमधले, इंद्रधनूचे असती,
पांढ-यातुनि निघति साती, पुन्हा पांढरे होती ¡¡
आकाशाला रंग नीळा दया,
छटा रूपेरी वरती असू दया,
निळयाआभाळी हिरवे राघू,
किती पाखरे उडती ||१ ||
अवतीभवती काढा डोंगर,
त्यावर तांबूस रंग काळसर
डोंगरतूनी खळखळ खळखळ
निर्झर स्वच्छ वाहती ||२||
चार नेमक्या काढा रेषा,
विटा विटांच्या भिंती सरशा,
लहान मोठ्या चौकोनांची
खिडक्यादारे होती ||३ ||
सजले आता तुमचे घरकुल,
पुढति त्याच्या पसरा हिरवळ,
पाऊलवाटेवरून तांबड्या सखेसोबती येती||५||

१) इंद्रधनुष्याचे रंग ___________ निर्माण होत नाहीत.
(सूर्य किरणांमुळे / पांढ-या रंगातून / सप्त रंगातून)
२) निळया आभाळात कोण उडत आहेत ? ( राघू / चिमण्या / निळे पक्षी)
३) कवीने सजलेल्या घरकुलासमोर _______ पसरायला सांगितली .
(रांगोळी / पाऊलवाट / हिरवळ)
४) चित्रातील भिंती कशा तयार होतात?
(साध्या विटांपासून / चार रेषांपासून / लाल रंगाच्या गोल्यांपासून)
५) पांढरा , जांभळा व हिरवा या रंगांच्या कवितेत नसलेल्या दोन दोन गोष्टींची नावे लिहा
६)तुम्हाला कोणत्या रंगाचे कपडे आवडतात? का ते सांगा.

**ब] खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा.** **(2)**

लाल लाल ________,अलगत ठेवा _______
______जांभळया फुलांची ________ वा-या ____||४||

**प्रश्न 3 अ] खालील शब्दांचे योग्य समान अर्थी शब्द निवडा** **(2)**

१) जंगल - ________ (रान / वन / शेत / शिवार)

२) जादू- ________ (कसरत / हात चलाखी/ मेजिक /करमणूक)

**आ ] खालील शब्दांचे योग्य विरुद्ध अर्थी शब्द निवडा** **(2)**

१) दूर x ____ (अलिकडे/ पलिकडे / तिकडे/ जवळ)

२) शांतx __( रागीट / थंड/अशांत / चिडचिडा)

**इ ] खालील शब्दांचे लिंग बदलेला योग्य शब्द निवडा.** **(2)**

१) वाघ- ________ ( वाघीण/ वाघोबा/ वाघ्या )

२) स्त्री - ________( स्त्री / स्त्रिया/ पुरुष/मुलगा )

**ई ] खालील शब्दांचे वचन बदलेला योग्य शब्द निवडा** **(2)**

१) खेळणी - _________ ( खेळणं/ खेळणे/ खेळ/ खेळण्या)

२) डोळा - ________ ( डोळे / डोळी / डोळ्या/डोळा)

**उ] खालील पर्यायी मराठी शब्द लिहा.** **(2)**

१) बाईक - ________ २) सॉरी - ________

**ऊ] खालील शब्दांचे तुम्हाला समजलेले अर्थ लिहा** **(2)**

१) क्षमायाचना - _________२) मुंडासे - ___________

**प्रश्न 4 सूचनेनुसार सोडवा : ( कोणतेही सहा )** **(6)**

१) तुषार अभ्यासात आहे हुशार. [अधोरेखित शब्दाची जात ओळखा ]

२) मुलांनी दररोज एक तास मैदानी खेळ खेळावे. [ क्रियापद ओळखा ]

३) आईने तो खाऊ कालच आणून ठेवला आहे. [ वाक्यातील नामे ओळखा ]

४) (त्याने) ______ पुस्तक वाचतो. [ कंसातील शब्दाचे योग्य रूप वापरा]

५) मी सर्वांना म्हणाले, “हो, आता करा सुरुवात.” [ वाक्यातील सर्वनामे ओळखा ]

६) बाईंनी मला सोनेरी पेन्सिल बाक्षिस दिली. [ वाक्यातील विशेषण ओळखा ]

७) सर बोलले, आता घरी जा खूप उशीर झाला. [ वाक्यातील क्रियापद ओळखा ]

८) ताई बाजारात गेली; पण दादाला भेट काय घ्यावी हेच ______सुचेना.

[रिकाम्या जागी योग्य सर्वनाम लिहा]

xxxxxxxxxxxx